# राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा

धर्म, जात, लिंग किंवा, संस्कृती यामध्ये जरी भिन्नता असली तरी राष्ट्रकुल संसदीय मंडळ हे सामाजिक जाणीव, कायद्यांचे पालन, व्यक्ति स्वातंत्र्य व हक्क याबाबत एकमत असलेल्या व संसदीय लोकशाही पध्दतीवर दृढ विश्वास असणा-या समविचारी मंडळींचा समुदाय आहे.

या मंडळाचे मुख्यालय लंडन येथे आहे. जगातील ५४ देशातील राष्ट्रीय, राज्य, प्रांतिक संसद / विधानमंडळ अशा एकूण१६३ शाखा आहेत. १५००० च्यावर संसदपटु या मंडळाचे सदस्य आहेत. दिनांक १४ जुलै १९५२ रोजी महाराष्ट्र विधानसभेने राष्ट्रकुल संसदीय मंडळाचा सभासद होण्याचा ठराव एकमताने संमत केला. त्या अन्वये राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखा अस्तित्वात आली.

## हेतु व उद्देश

(अ) शाखेच्या सदस्यांमधील वैयक्तिक संबंध वृध्दिंगत करणे.

(ब) महाराष्ट्र विधानमंडळासमोर येऊ शकणा-या सार्वजनिक महत्वाच्या प्रश्नांसंबंधी विचारविनिमय करणे.

(क ) राजकीय, सामाजिक , आर्थिक आणि शैक्षणिक समस्यांवर महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य आणि त्या त्या क्षेत्रातील तज्ञांची व्याख्याने आयोजित करणे.

(ड) राष्ट्रकुलातल्या इतर देशांचे दौरे आयोजित करून संसदीय शासन प्रणाली व प्रशासन यावरील विचारांची, माहितीची देवाण - घेवाण करून सदस्य राष्ट्रांमधील वैयक्तिक संबंध सुधारण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

## पदाधिकारी

मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद आणि मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा हे शाखेचे पदसिध्द सह अध्यक्ष असतात. शाखेचे चार उपाध्यक्ष असतात.

(१) मुख्यमंत्री

(२) विरोधी पक्षनेता,विधानपरिषद,

(३) विरोधी पक्षनेता, विधानसभा

(४) शाखेच्या सदस्यांमधून निवडून आलेले.

खजिनदार देखील शाखेच्या सदस्यांमधून निवडून आलेले असतात. शाखेच्या कार्यकारिणीत ३० सदस्य असतात. यात सहअध्यक्ष, उपाध्यक्ष, खजिनदार आणि महाराष्ट्र विधानमंडळाचे उप पीठासीन अधिकारी यांचा पदसिध्द सदस्य म्हणून समावेश असतो. उर्वरित सदस्य निवडून आलेले असतात.

## वर्गणी

प्रत्येक विद्यमान तसेच माजी सदस्यास रूपये ५०० वर्गणी भरून शाखेचे आजीव सदस्य होता येते अथवा प्रत्येक विद्यमान तसेच माजी सदस्यास रूपये १०० वर्गणी भरून शाखेचे वार्षिक सभासद होता येते.

## उपक्रम

(१) नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांना सभागृहातील कामकाजाची माहिती करून देण्यासाठी अभ्यासवर्ग आयोजिले जातात.

(२) सन १९६४ पासून नागपूर येथे होणा-या विधीमंडळाच्या अधिवेशनामध्ये राज्यातील विद्यापीठांतील ‘राज्यशास्त्र’ व ‘लोकप्रशासन’ या विषयांचा अभ्यास करणा-या पदव्युत्तर विद्यार्थ्यासाठी संसदीय प्रथा व

कार्यप्रणाली या विषयांवर अभ्यासवर्ग आयोजित केला जातो. त्यावेळेस संसदीय शासन प्रणालीशी प्रत्यक्ष संबंध असलेल्या नामवंत संसदपटुंची विविध विषयांवर व्याख्याने आयोजित केली जातात.

३) सन १९९५ पासून सभागृहात उत्कृष्ट कामगिरी बजावणा-या दोन्ही सभागृहातील प्रत्येकी दोन सदस्यांना 'उत्कृष्ट संसदपटु' व 'उत्कृष्ट भाषणाचे' पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. यांचे निकष खालीलप्रमाणे आहेतः-

## उत्कृष्ट भाषण व संसदपटु पुरस्कारासाठी निकष

(१) सदस्यांचा अनुभव

(२) वक्तृत्व शैली

(३) राज्याच्या व एकूण देशाच्या प्रश्नांची जाण.

(४) विषयाच्या मांडणीतील विविधता व वैचारिक ख़ोली.

(५) भाषेवरील प्रभुत्व.

(६) सभागृहाचे नियम व पध्दती तसेच सभ्यता व शिष्टाचार यांचे पालन.

(७) विविध समित्यांच्या कामाचा अनुभव.

## सभागृहातील उत्कृष्ट भाषणाच्या पुरस्कारासाठी निकष

(१) वक्तृत्व शैली.

(२) विषयाची मांडणी व भाषेवरील प्रभुत्व.

(३) नियत वेळेत जास्तीत जास्त सुविहितपणे विषय मांडण्याची क्षमता.

शाख़ेतर्फे महत्वाच्या विषयांवर चर्चासत्र / परिसंवाद आयोजित केले जातात. राष्ट्रकुल संसदीय मंडळाद्वारे प्रतिवर्षी आयोजित करण्यात येणा-या अभ्यासवर्ग, परिसंवाद तसेच वार्षिक परिषदेस शाख़ेतर्फे प्रतिनिधी

पाठविले जातात.

## पीठासीन अधिका-यांची परिषद

संसद व राज्य विधानमंडळाच्या पीठासीन अधिका-यांची परिषद देशांतर्गत विविध राज्यांपैकी एका राज्यात वर्षातून एकदा घेण्यात येते व यात दोन ते तीन दिवस परिसंवाद होतात. महत्वाच्या वैधानिक विषयावर अथवा एख़ादी घटनात्मक वादविवादाची बाब उपस्थित झाली असल्यास त्यावर परिसंवाद आयोजित करण्यात येतो. संसदीय कार्य-प्रणालीत आलेले विविध संसदीय व वैधानिक विषय व त्या संबंधातील अनुभव व त्याबाबतीतील विचारांची देवाण- घेवाण या परिषदेच्या माध्यमातून करण्यात येते व संसदीय कार्यपध्दतीतील उणीवांवर मार्ग काढण्यात येतात. संसदीय कार्यप्रणालीशी संबधित संकेत व परंपरा यांचे पालन तसेच राज्य विधानमंडळाच्या कामात एकरूपता व सुसूत्रता आणणे ह्या प्रमुख उद्दिष्टांचे अवलोकन करण्यात येते. लोकसभेचे अध्यक्ष हे या परिषदेचे पदसिध्द अध्यक्ष असतात तसेच लोकसभेचे महासचिव हे या परिषदेचे पदसिध्द सचिव असतात. सर्वसाधारणपणे सदरहू परिषद संसद व राज्य विधानमंडळाच्या निःसत्र कालावधीत घेण्यात येते.

## सचिवांची परिषद

देशांतर्गत सर्व राज्याच्या विधानमंडळ सचिवालयातील प्रशासकीय व वैधानिक कार्यपध्दतीत एकरूपता व सुसूत्रता ठेवण्याच्या दृष्टीने चर्चा करण्याकरिता संसद व राज्य विधानमंडळाच्या सचिवांची एक दिवसीय

परिषद आयोजिण्यात येते.  ही परिषद सर्वसाधारणपणे पीठासीन अधिका-यांच्या परिषदेच्या कार्यक्रमास जोडून आयोजिण्यात येते. या परिषदेत घेण्यात आलेले महत्वाचे निर्णय संकलित करुन त्याच्या प्रती अंमलबजावणीकरिता सर्व राज्यांच्या विधानमंडळ सचिवालयांना स्वतंत्रपणे वितरित करण्यात येतात व तत्संबंधांतील  प्रणालीचे अवलोकन करण्यात येते.